श्री.शिवराम बुधा सुपे,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत लोणीखुर्द, ता.राहाता यांच्या सेवानिलंबन कालावधीचे निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३२९/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ:- १.या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/४८६/२०१७, दि.०६/०७/२०१७
२.या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश क्र.ग्रापं-३/२६७/२०१८, दि.२२/०३/२०१८
३.या कार्यालयाचे अंतीम शिक्षा आदेश क्र.ग्रापं-३/५२५/२०२२,दि.२९/०६/२०२२
४.अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्रं.जि प कर्मचारी अपील क्र. ७०/२०२२ जा.क्र. २६१६ दिनांक- २४/२/२०२३.
५.या कार्यालयाकडील आदेश क्र.ग्रापं-३/६६१९३४, दि.०५/११/२०२४.
६.गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचे पत्र क्र.आस्था-२/११५१/२५ दि.०९/०५/२०२५.

संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये, श्री.शिवराम बुधा सुपे,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता.राहाता येथे कार्यरत असतांना गैरवर्तन प्रकरणी जिल्हा परिषद सेवेतुन दि.२१/०७/२०१७ रोजी निलंबित करण्यात आले होते. संदर्भ क्र.२ नुसार दि.२२/०३/२०१८ च्या आदेशानुसार नेवासा येथे पुन:स्थापित करुन दि.०२/०४/२०१८ रोजी नेवासा पंचायत समिती येथे हजर झालेले आहे. संदर्भ क्र.३ नुसार श्री सुपे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द,ता.राहाता यांची पुढील वेतनवाढ कायमस्वरुपी दोन वर्ष थोपविण्याची शिक्षा करण्यात आली होती.

सदर शिक्षेस संदर्भ क्र.४ नुसार अपीलार्थी यांचे अपील मान्य करुन संदर्भ क्र.३ चा आदेश रद्द करण्यात आल्याबाबतचा आदेश संदर्भ क्र.५ अन्वये देण्यात आला आहे. तथापि संदर्भ क्र.६ अन्वये श्री.शिवराम बुधा सुपे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता.राहाता यांचा दि.२१/०७/२०१७ ते दि.०१/०४/२०१८ असा एकूण ०८ महिने १२ दिवस (२५४ दिवस) निलंबन कालावधीचा निर्णय होणे बाकी आहे.

श्री.शिवराम बुधा सुपे,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता.राहाता महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (३) (४) मधील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री.शिवराम बुधा सुपे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता. राहाता यांचा दि.२१/०७/२०१७ ते दि.०१/०४/२०१८ असा एकूण ०८ महिने १२ दिवस (२५४ दिवस) हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी कर्तव्य कालावधी धरण्यात यावा, असे आदेश देत आहे. सदर आदेशाची नोंद श्री.शिवराम बुधा सुपे,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता.राहाता यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 2026110e06029e असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-11-2026 12:55:52
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.शिवराम बुधा सुपे,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी ग्रापं-लोणीखुर्द, ता.राहाता
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.

२/- सोबतचा आदेश श्री.शिवराम बुधा सुपे, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.